आर बी आय २००६-०७/२२०
आर पी सी डी . सी ओ. आर आर बी . बीसी क्र./ ३९/०३.०५.३३ (ई)/ २००६-०७

डिसेंबर २६, २००६

प्रति,
सर्व प्रादेशिक ग्रामीण बँका (आर आर बीज)

प्रिय महोदय,

**चेक टाकण्यासाठी पेटीची सुविधा व चेकच्या पावतीसाठी सुविधा यु सी बी ज**

१. भारतीय रिझर्व बँक/ बँक व्यवहार लोकपाल यांचेकडे तक्रारी येत आहेत की, बऱ्याचशा बँक शाखा काऊंटरवर चेकचा स्वीकार न करता, ते चेक्स टाकण्यासाठी असलेल्या पेटीत टाकण्यास ग्राहकांना भाग पाडत आहेत.

२. वरील संदर्भात बँकांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या ग्राहकांना चेक पेट्यांमध्येच चेक्स टाकण्यास भाग पाडू नये. चेक्स टाकण्यासाठी पेटीची सुविधा जरी ग्राहकांसाठीच केलेली असली तरी सुध्दा त्या चेक्स च्या पावत्या, चेक जमा करण्यासाठी असलेल्या नेहमीच्या काऊंटर्सवरच ग्राहकांना दिले जाणे नाकारले जाऊ नये. ग्राहकांनी काऊंटर्सवरच जमा केलेल्या चेक्सच्यापावत्या देण्यास कोणत्याही बँकेने नकार देऊ नये.

३. जेथे-जेथे म्हणून चेक्स टाकण्याची पेटी आली आहे तेथे-तेथे, ग्राहकांना त्यांना उपलब्ध असलेल्या दोन्हीही पर्यायांची, म्हणजे - चेक्स पेटीत टाकणे किंवा काऊंटर्सवर जमा करणे - जाणीव करून देण्यात यावी व त्यामुळे ते जाणीवपूर्वक योग्य तो निर्णय स्वतःच घेऊ शकईल. **यासाठी बँकांना सूचित करण्यात येत आहे की त्यांनी न चुकता चेक्स जमा पेटीवरच पुढीलप्रमाणे संदेश प्रदर्शित करावा.**

**“ग्राहक त्यांचे चेक्स काऊंटरवरही जमा करू शकतात व त्यांची पोच पे-इन- स्लिपवर घेऊ शकतात”**

वरील संदेश, इंग्रजी, हिंदी आणि त्या राज्याच्या प्रादेशिक भाषेत प्रदर्शित करावा.

४. कृपया याची पोच संबंधित प्रादेशिक कार्यालयाकडे पाठवावी.

आपला विश्वासू

(जी. श्रीनिवासन)
प्रमुख महा व्यवस्थापक